नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२६ Issue - 326 | वार शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२६ Blow- Friday Date 17 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नारी शक्ती वंदन अधिनियम लोकसभेत सादर

## लोकसभेतील जागांमध्ये मोठी वाढ होणार; महिला आरक्षण विधेयक हा केवळ कायदेशीर बदल नसून तो एक सामाजिक बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असला तरी महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व अजूनही समाधानकारक नाही. लोकसंख्येच्या जवळपास अर्धा भाग असलेल्या महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग अत्यल्प आहे. या पार्श्वभूमीवर महिलांसाठी राजकीय आरक्षण हा मुद्दा दीर्घकाळ चर्चेत राहिला असून अलीकडील घडामोडींमुळे तो पुन्हा केंद्रस्थानी आला आहे. भारताची लोकशाही सतत बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि लोकसंख्यात्मक वास्तवाशी जुळवून घेत पुढे जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित संविधान (१३१वे दुरुस्ती) विधेयक, २०२६ हे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. या विधेयकाद्वारे लोकसभेच्या जागांची संख्या वाढवणे आणि महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू करणे असे दोन मोठे बदल सुचवले आहेत. त्यामुळे भारतीय संसदीय व्यवस्थेच्या रचनेत आणि प्रतिनिधित्वाच्या स्वरूपात मूलभूत बदल घडू शकतात; मात्र लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८५० करण्यात येत असल्याने उत्तर भारतातील जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांना अधिक जागा मिळण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या आड दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व कमी करण्याचा डाव तर नाही ना, असा आक्षेप घेतला जात आहे.

महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण हा सकारात्मक आणि आवश्यक निर्णय असला तरी त्याची अंमलबजावणी जनगणना आणि परिसीमनाशी जोडल्याने मोठा अडथळा ठरत आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर काही राजकीय टीकाही होत आहे. काही विश्लेषकांच्या मते, महिला आरक्षणाचा मुद्दा पुढे करून प्रत्यक्षात परिसीमनाच्या मोठ्या बदलांना स्वीकारार्ह बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तर काहींचे मत आहे की, या निर्णयामागे आगामी निवडणुकांमध्ये राजकीय फायदा मिळवण्याची रणनीती असू शकते. विरोधकांच्या या शंकाना उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत म्हणाले की, विकसित भारत म्हणजे केवळ रस्ते, रेल्वे किंवा पायाभूत सुविधांची आकडेवारी नव्हे, तर धोरण निर्मितीत महिलांना भागीदार बनवणे होय. तसेच जे लोक केवळ राजकीय फायद्याचा विचार करून या विधेयकाचा विरोध करत आहेत, त्यांना पंतप्रधानांनी इशारा दिला की, आता महिला केवळ लाभार्थी राहिलेल्या नाहीत, तर त्या स्वतःचे स्वतंत्र मत मांडत आहेत. तसेच वेळप्रसंगी आपल्या हक्कांसाठी आवाज उठवत आहेत.



सध्या लोकसभेत ५४३ सदस्य आहेत, तर संविधानाने कमाल मर्यादा ५५० निश्चित केली आहे. नव्या प्रस्तावानुसार ही मर्यादा वाढवून ८५० करण्यात येणार आहे, ज्यामध्ये ८१५ जागा राज्यांसाठी आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी असतील. ही वाढ केवळ संख्यात्मक बदल नसून ती भारतातील बदलत्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व अधिक अचूकपणे करण्याचा प्रयत्न आहे. लोकसभा जागांचे वाटप १९७१ च्या जनगणनेवर आधारित ठेवले होते आणि १९७६ पासून त्यावर स्थगिती देण्यात आली होती. यामागील उद्देश लोकसंख्या नियंत्रणाला प्रोत्साहन देणे हा होता; मात्र, आता ही स्थगिती हटवून नव्या जनगणनेच्या आधारे परिसीमन करण्याचा प्रस्ताव आहे.

परिसीमन म्हणजे लोकसंख्येनुसार मतदारसंघांची पुनर्रचना करणे. या प्रक्रियेमुळे प्रत्येक मतदारसंघातील लोकसंख्या साधारण समान राहते आणि प्रतिनिधित्व अधिक न्याय्य होते; मात्र, याच मुद्द्यावरून वाद निर्माण झाला आहे. दक्षिण भारतातील राज्यांनी या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवला आहे. कारण त्यांनी लोकसंख्या नियंत्रणात उल्लेखनीय यश मिळवले आहे, तर उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. जर जागांचे वाटप लोकसंख्येच्या प्रमाणात केले गेले, तर उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांना अधिक जागा मिळतील आणि दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व तुलनेने कमी होईल. त्यामुळे अशी भावना दक्षिणेकडील राज्यांमध्ये निर्माण झाली आहे; मात्र या विधेयकाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण होय. सध्या लोकसभेत महिलांचे प्रतिनिधित्व केवळ सुमारे १४ टक्के इतकेच आहे, जे जागतिक सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. स्वीडन, नॉर्वे आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व ४० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. विशेष म्हणजे, या देशांमध्ये संसदेत थेट आरक्षण नसतानाही राजकीय पक्ष त्यांच्या पातळीवर महिला उमेदवारांना प्राधान्य देतात. याउलट, जगातील सर्वात मोठी लोकशाही अशी बिरुदावली मिरवत असलेल्या भारतात महिलांना तितकी समान संधी मिळत नाही. यावरून असे दिसते की, महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी कायदेशीर तरतुदींबरोबरच राजकीय इच्छाशक्ती, पक्षांतर्गत सुधारणा आणि सामाजिक बदल आवश्यक आहेत.

सध्याचे केंद्र सरकार त्या अनुषंगाने सकारात्मक प्रयत्न करीत आहे. महिलांना निर्णय प्रक्रियेत अधिक संधी मिळावी, राजकारण अधिक समावेशक व्हावे यासाठी हे आरक्षण आवश्यक मानले जाते. खरंतर महिलांसाठी लोकसभा व विधानसभेत आरक्षण देण्याचे अनेक प्रयत्न झाले. विविध वेळा विधेयके मांडली गेली, परंतु ती लागू होऊ शकली नाहीत. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अजूनही अत्यंत कमी आहे. १७व्या लोकसभेत महिलांचे प्रमाण सुमारे १४.३ टक्के होते. तर १८व्या लोकसभेत हे प्रमाण आणखी थोडे कमी झाले आहे. ही परिस्थिती लक्षात घेता महिलांना राजकारणात समान संधी देण्यासाठी आरक्षणाची गरज अधोरेखित होते. १९९३ मध्ये झालेल्या ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्तींमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी किमान एक–तृतीयांश जागा आरक्षित केल्या. या निर्णयामुळे महिलांना मोठ्या प्रमाणात राजकारणात प्रवेश मिळाला. परिणामी स्थानिक पातळीवर त्यांचे नेतृत्व विकसित झाले. अनेक अभ्यासांमधून असे दिसून आले आहे की, महिला प्रतिनिधींनी पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांवर अधिक लक्ष केंद्रित केले. त्यामुळेच केंद्र सरकार मांडत असलेले सध्याचे विधेयक महिला सक्षमीकरणासाठी मैलाचा दगड ठरत आहे; मात्र त्याची अंमलबजावणी घाईगडबडीत आणि व्यापक सहमतीशिवाय झाली, तर ते प्रादेशिक असंतोष, राजकीय तणाव आणि संघराज्यीय असमतोल वाढवू शकते.

# राज्यात लवकरच १०० महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत राज्यात युवक–युवतींसाठी महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र प्रथम टप्प्यात शंभर केंद्र सुरू करण्यात येणार आहेत आगामी काळात राज्यात या कौशल्य विकास केंद्रांची एक हजार पर्यंत ही संख्या वाढविणार आहोत. ही योजना मुंबई महापालिका क्षेत्रात ही मुंबई शहर व उपनगर मध्ये राबविण्यात येणार आहे.महानगरपालिकेमार्फत या कौशल्य केंद्रांसाठी जागा उपलब्ध करून देण्याची विनंती आयुक्तांना पत्राद्वारे करण्यात आली आहे अशी माहिती मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

मुंबई महानगरपालिकेत आयोजित पत्रकारांशी संवाद साधताना कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते.महापालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांचीही भेट त्यांनी घेतली. या भेटीदरम्यान मुंबईच्या विविध समस्यांसह तरुणांच्या रोजगारासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करणे या योजनेत नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणासोबत कौशल्याची सांगड घालण्यात येणार आहे.झोपडपट्टी परिसरातही ही प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. शहरी भागात आवश्यक असलेले कौशल्य शिकविण्यात येतील. पदवी सोबत कौशल्य अवगत असेल तरच रोजगाराच्या संधी अधिक उपलब्ध होतील. हँगिंग गार्डन (फिरोजशहा मेहता गार्डन) येथे ज्येष्ठ नागरिकांच्या सुविधेसाठी रॅम्प तयार करणे, सायन येथील 'अम्मान देखनी' संस्थेजवळील डीपी रोडवर झालेले अतिक्रमण हटवून तो रस्ता रहिवाशांसाठी मोकळा करावा, याबाबत मुंबई महापालिका आयुक्तांशी चर्चा करण्यात आली.मुंबईतील पायाभूत सुविधा आणि तरुणांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महानगरपालिका आणि राज्य सरकार मिळून काम करतील, असा विश्वास यावेळी मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला.

## चटई क्षेत्रफळात वाढ; सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा निर्णय

# सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची घरे होणार अधिक प्रशस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांबाबत राज्य सरकारने एक महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. बदलती जीवनशैली आणि वाढत्या गरजा लक्षात घेऊन शासकीय निवासस्थानांच्या चटई क्षेत्रफळात (कार्पेट एरिया) वाढ करण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गुरुवारी जाहीर केला. या निर्णयामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना आता अधिक आधुनिक आणि प्रशस्त घरे उपलब्ध होणार आहेत.

सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार विविध गटांतील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांचे क्षेत्रफळ नव्याने निश्चित करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) निर्गमित केला असून, उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनंतर यावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.


सुधारित आराखड्यानुसार, ही निवासस्थाने टाईप–ए ते टाईप–जी अशा विविध श्रेणींमध्ये विभागली आहेत. उच्च पदस्थ अधिकाऱ्यांसाठी २४० चौरस मीटरपर्यंत, तर निम्न वेतनगटातील कर्मचाऱ्यांसाठी किमान ४५ चौरस मीटर क्षेत्रफळ निश्चित करण्यात आले आहे. नवीन रचनेत बैठकीची खोली, स्वतंत्र भोजनकक्ष, शयनकक्ष, आधुनिक स्वयंपाकघर आणि बाल्कनीचा समावेश असेल. विशेष म्हणजे, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांत कार्यालयीन कक्ष, अभ्यासिका आणि सेवक कक्षही उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

आधुनिक सुविधांवर भर

केवळ जागेत वाढ न करता सुविधांमध्येही सुधारणा करण्यात आली आहे. प्रत्येक खोलीत इंटरनेट आणि दूरध्वनी सुविधेसाठी स्वतंत्र पॉइंट्स दिले जातील.

बहुमजली इमारतींमध्ये जिने, कॉरिडॉर आणि सामाईक सोयींसाठी स्वतंत्र जागा राखून ठेवली जाईल, जेणेकरून घराच्या मुख्य क्षेत्रफळावर त्याचा परिणाम होणार नाही.

हा निर्णय केवळ नव्याने सुरू होणाऱ्या बांधकाम प्रकल्पांसाठी लागू असेल. सध्या बांधकामाधीन असलेल्या किंवा पूर्ण झालेल्या इमारतींच्या रचनेत कोणताही बदल केला जाणार नाही. ज्या कर्मचाऱ्यांना आधीच निवासस्थाने वाटप झाली आहेत, त्यांच्या श्रेणीमध्ये कोणताही बदल होणार नाही.



## संपादकीय....

# महिलांना दिलासा

महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण हा सकारात्मक आणि आवश्यक निर्णय असला तरी त्याची अंमलबजावणी जनगणना आणि परिसीमनाशी जोडल्याने मोठा अडथळा ठरत आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर काही राजकीय टीकाही होत आहे. काही विश्लेषकांच्या मते, महिला आरक्षणाचा मुद्दा पुढे करून प्रत्यक्षात परिसीमनाच्या मोठ्या बदलांना स्वीकारार्ह बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिला आरक्षण विधेयक हा केवळ कायदेशीर बदल नसून तो एक सामाजिक बदल आहे. लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधित्वाचा समतोल राखताना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही, हे पाहणे सरकारपुढील मोठे आव्हान आहे. पंतप्रधानांनी सभागृहात दिलेली 'निष्पक्ष परिसीमनाची हमी' आणि विरोधकांनी उपस्थित केलेले सामाजिक न्यायाचे मुद्दे यांचा सुवर्णमध्य साधला, तरच खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाही 'सर्वसमावेशक' ठरेल. इतिहास भूगोल नंतर आता भारताचे नागरीकशास्त्र बदलणार आहे. भारत सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. संसदेत ३ विधेयके सादर झाली. लोकसभेच्या जागांची संख्या वाढणार आहे. लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश म्हणजेच ३३ टक्के आरक्षण लागू होणार आहे. मतदारसंघांची नव्याने पुनर्रचना करण्यासाठी हे विधेयक आणले जात असल्याचे सभागृहाचे उद्देश आहे. यामुळे भारतातील खासदारांची संख्या ५४३ वरून ८५० इतक होण्याची शक्यता आहे. मतदारसंघांची पुनर्रचना म्हणजे काय, ही वाढ कधी होईल आणि कोणत्या आधारावर जागांची संख्या वाढवली जाईल. पुनर्रचना विधेयकाबद्दल जाणून घेऊया. संपूर्ण देशाचं लक्ष लागलेल्या महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक संसदेत सादर करण्यात आली. मोदी सरकारनं ही विधेयकं मंजूर करण्यासाठी तीन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलावले आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास, सध्याच्या लोकसंख्येच्या आधारावर जागावाटप सुनिश्चित करण्यासाठी संविधानाच्या काही कलमांमध्ये दुरुस्ती करावी लागणार आहे. या विधेयकानुसार, लोकसभेतील सदस्यांची कमाल संख्या ८१५ पर्यंत वाढवली जाऊ शकते. याव्यतिरिक्त, केंद्रशासित प्रदेशांमध्ये ३५ जागांची वाढ होवू शकतो. भारतातील २८ राज्य आणि ८ केंद्रशासित प्रदेश मिळून संपूर्ण देशात एकूण जागांची संख्या ८५० इतकी होऊ शकते.

# वारसा म्हणजे संस्कृतीचा श्वास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी १८ एप्रिल हा दिवस 'जागतिक वारसा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि या दिवसाचे महत्त्व केवळ औपचारिक स्मरणापुरते मर्यादित न राहता, मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीतील सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक संपदेचे महत्त्व अधोरेखित करणारा एक चिंतनाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक ठरते. मानवी समाजाने हजारो वर्षांच्या कालखंडात निर्माण केलेल्या परंपरा, मूल्ये, स्थापत्यकला, कला, ज्ञानप्रणाली आणि सामाजिक संस्था यांचा एकत्रित संच म्हणजे वारसा होय. हा वारसा केवळ भूतकाळाचा अवशेष नसून वर्तमानातील ओळखीचा पाया आणि भविष्याच्या विकासाचा मार्गदर्शक आहे. त्यामुळे जागतिक वारसा दिन हा आपल्याला आपल्या मुळांशी पुन्हा जोडणारा, आपली ओळख दृढ करणारा आणि जतनाची जबाबदारी जाणवून देणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे.

वारसा या संकल्पनेचा व्यापक विचार केला असता, त्यात भौतिक आणि अमूर्त अशा दोन्ही घटकांचा समावेश होतो. भौतिक वारशामध्ये किल्ले, मंदिरे, विहारे, स्मारके, गुहा, ऐतिहासिक वास्तू, पुरातत्त्वीय स्थळे, लेण्या आणि निसर्गसंपन्न क्षेत्रांचा समावेश होतो. या स्थळांमध्ये त्या त्या काळातील स्थापत्यकौशल्य, तांत्रिक प्रगती आणि सांस्कृतिक दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. दुसरीकडे अमूर्त वारशामध्ये भाषा, लोकपरंपरा, सण-उत्सव, लोककला, संगीत, नृत्य, जीवनशैली आणि श्रद्धा यांचा समावेश होतो. हे अमूर्त घटक समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचे प्रतीक असतात आणि ते समाजाच्या मानसिकतेचे, विचारसरणीचे आणि जीवनमूल्यांचे दर्शन घडवतात. या दोन्ही प्रकारचा वारसा एकमेकांशी परस्परपूरक असून समाजाच्या ओळखीचा पाया तयार करतात.

भारतीय वारशाचा विचार केला तर त्याची व्याप्ती आणि वैविध्य हे जगातील इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत अधिक समृद्ध आहे. प्राचीन सिंधू संस्कृतीपासून सुरू झालेला हा प्रवास वैदिक, बौद्ध, जैन, मौर्य, गुप्त, चालुक्य, मुघल आणि मराठा अशा विविध कालखंडांतून पुढे सरकत आधुनिक भारतापर्यंत पोहोचतो. प्रत्येक कालखंडाने आपल्या संस्कृतीचे, कलेचे आणि विचारांचे वेगळे योगदान दिले आहे. भारतातील विविध धर्म, भाषा, जाती आणि परंपरा यांनी मिळून एक बहुरंगी सांस्कृतिक पट तयार केला आहे. त्यामुळे भारतातील वारसा स्थळे ही केवळ पर्यटनाची साधने नसून ती इतिहासाची साक्ष देणारी जिवंत कागदपत्रे आहेत.

महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर येथील वारसा हा अत्यंत प्रेरणादायी आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये उभे असलेले किल्ले हे स्वराज्याच्या संघर्षाचे आणि शौर्याचे प्रतीक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले हे किल्ले आजही आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची प्रेरणा देतात. अजिंठा-वेरूळ लेण्यांतील शिल्पकला आणि भित्तिचित्रे प्राचीन भारतीय कलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदाय, भजन-कीर्तन, लोकनृत्य आणि सण-उत्सव हे महाराष्ट्राच्या अमूर्त वारशाचे महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व गोष्टी समाजाच्या सांस्कृतिक ओळखीला आकार देतात आणि सामाजिक एकात्मता वाढवतात.

आजच्या आधुनिक युगात वारसा जतन करणे ही एक मोठी आव्हानात्मक जबाबदारी बनली आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि वाढते पर्यटन यामुळे अनेक वारसा स्थळांवर ताण निर्माण झाला आहे. अतिक्रमण, प्रदूषण, दुर्लक्ष आणि अनियंत्रित विकास यामुळे अनेक ऐतिहासिक स्थळांचे नुकसान होत आहे. काही ठिकाणी तर वारसा स्थळांचे मूळ स्वरूपच नष्ट होत आहे. यामागे केवळ शासनाची कमतरता नसून समाजातील जागरूकतेचा अभावही कारणीभूत आहे. अनेकदा लोक वारसा स्थळांकडे केवळ मनोरंजनाच्या दृष्टीने पाहतात आणि त्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्वाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वारसा जतनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सजग होणे आवश्यक आहे.

वारसा संवर्धनासाठी शिक्षण हे अत्यंत प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच आपल्या वारशाचे महत्त्व पटवून दिल्यास त्यांच्या मनात जतनाची भावना निर्माण होते. इतिहासाचा अभ्यास केवळ पाठांतरापुरता मर्यादित न ठेवता, त्यामागील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ समजावून सांगणे आवश्यक आहे. शैक्षणिक सहलींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारसा स्थळांचा प्रत्यक्ष अनुभव दिल्यास त्यांचे ज्ञान अधिक समृद्ध होते आणि त्यांच्या मनात वारशाबद्दल आदर निर्माण होतो. शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण झालेली ही जाणीव भविष्यात वारसा संवर्धनासाठी उपयुक्त ठरते.

तंत्रज्ञानाच्या युगात वारसा जतनासाठी नवीन साधने उपलब्ध झाली आहेत. डिजिटल दस्तऐवजीकरण, आभासी पर्यटन, त्रिमितीय प्रतिकृती आणि डिजिटल संग्रहालयांच्या माध्यमातून वारशाचे जतन अधिक प्रभावीपणे करता येते. यामुळे जगभरातील लोकांना विविध वारसा स्थळांची माहिती सहजपणे उपलब्ध होते. तसेच आपत्तीच्या काळात या डिजिटल नोंदींचा उपयोग वारसा पुनर्स्थापनासाठी होऊ शकतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून वारसा जतनाची प्रक्रिया अधिक सक्षम करता येते.

पर्यटन आणि वारसा यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे. वारसा स्थळांमुळे पर्यटनाला चालना मिळते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळते. परंतु अनियंत्रित पर्यटनामुळे वारसा स्थळांचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शाश्वत पर्यटनाची संकल्पना स्वीकारणे आवश्यक आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागून वारसा स्थळांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. स्थानिक समुदायांचा सहभाग वाढवून पर्यटन व्यवस्थापन अधिक प्रभावी करता येते.

वारसा जतन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. आपल्या दैनंदिन जीवनातही आपण वारसा जतनासाठी योगदान देऊ शकतो. घरातील परंपरा जपणे, स्थानिक कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणे, वारसा स्थळांवर स्वच्छता राखणे आणि त्यांचे संरक्षण करणे या छोट्या कृतीतून मोठा बदल घडवून आणता येतो. समाजातील प्रत्येक घटकाने या कार्यात सहभागी झाल्यास वारसा जतनाची प्रक्रिया अधिक प्रभावी होईल.



जागतिक वारसा दिनाच्या निमित्ताने आपण आपल्या वारशाचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज आहे. आपण कोण आहोत, आपल्या समाजाची ओळख काय आहे आणि भविष्यात आपण कोणत्या दिशेने जावे याचा विचार या दिवशी करणे आवश्यक आहे. वारसा हा केवळ भूतकाळाचा ठेवा नसून तो आपल्या भविष्याचा मार्गदर्शक आहे. त्यामुळे त्याचे जतन करणे ही आपल्या अस्तित्वाशी निगडित जबाबदारी आहे.

आजच्या पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे आधुनिकतेच्या प्रवाहात आपली सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवणे. जागतिकीकरणामुळे विविध संस्कृतींचा प्रभाव वाढत असताना आपली परंपरा आणि मूल्ये जपणे अधिक कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत वारसा हा आपल्या ओळखीचा आधार ठरतो. त्यामुळे वारसा जतन करणे म्हणजे केवळ इतिहास जपणे नव्हे, तर आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे होय.

शेवटी असे म्हणता येईल की जागतिक वारसा दिन हा आपल्याला आपल्या भूतकाळाशी जोडणारा, वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्याला प्रेरणा देणारा एक महत्त्वपूर्ण दिवस आहे. या निमित्ताने आपण सर्वांनी वारसा जतनाची प्रतिज्ञा करावी आणि आपल्या कृतीतून त्याची अंमलबजावणी करावी. कारण जे समाज आपला वारसा जपतात, तेच समाज खऱ्या अर्थाने समृद्ध आणि सक्षम बनतात. वारसा हा आपल्या पूर्वजांनी दिलेला अमूल्य ठेवा आहे आणि तो पुढील पिढ्यांसाठी जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

- डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

# चेहऱ्यावर हसू असलेली व्यक्ती सर्वात सुंदर : अनिल दिक्षित

**वीरशैव व्हिजनच्या बसव व्याख्यानमालेस प्रारंभ**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर : सध्याच्या जगात व्यक्ती सुंदर दिसण्यासाठी अनेकविध प्रक्रिया करते. सौन्दर्यप्रसाधने उद्योग सध्या भलताच तेजीत आहे. सलून व पार्लर व्यवसायाला सध्या चांगले दिवस आलेत. असे जरी असले तरी चेहऱ्यावर हसू असलेली व्यक्ती जगातील सर्वात सुंदर व्यक्ती असते असे प्रतिपादन कवी अनिल दिक्षित यांनी केले.

महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनच्यावतीने आयोजित केलेल्या बसव व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना श्री दिक्षित बोलत होते. 'हास्यरंग' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. याप्रसंगी नगरसेवक अमोल शिंदे, सिद्धेश्वर पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे, दक्षिण सोलापूर शिक्षण मंडळ विश्वस्त अण्णासाहेब कोतली, सोलापूर शहर बुरुड समाज माजी अध्यक्ष दशरथ वडतिले, साकव प्रतिष्ठानचे अध्यक्ष जगदीश पाटील, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार उपस्थित होते.

यावेळी कवी दिक्षित यांनी सादर केलेल्या 'सैराट' या कवितेने व 'खरातच्या अंगणी सत्संग' या विडंबन गीताने हास्याची निर्मिती केली. कवी भालचंद्र कोळपकर यांनी 'मामाची पोरगी' याबरोबरच अनेक विनोदी कविता सादर करून श्रोत्यांना खळखळून हसविले.

यावेळी आनंद दुलंगे, संजय साखरे, सोमेश्वर याबाजी, नागेश बडदाळ, राजेश नीला, मनोज पाटील, श्रीमंत मेरू, योगेश कापसे, माधुरी बिराजदार, रेश्मा निडगुंदी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बुरकुले यांनी, स्वागत विजयकुमार बिराजदार यांनी तर सूत्रसंचालन राहुल बिराजदार यांनी केले. आभार प्रदर्शन विजयकुमार बिराजदार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अविनाश हत्तरकी, सोमनाथ चौधरी, बसवराज जमखंडी, सिद्धेश्वर कोरे, गंगाधर झुरळे, गौरीशंकर अतनुरे, प्रा. मल्लिकार्जुन पाटील, अमित कलशेट्टी, विजयकुमार हेले यांनी परिश्रम घेतले.

# विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान कडून प्रशांत माळवदे यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवानिमित्त डिजिटल मीडियातील उल्लेखनीय कार्याबद्दल पत्रकार प्रशांत माळवदे यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सदस्य हभप ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते शाल, फेटा, हार, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.




यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डी राज सर्वगोड समितीचे अध्यक्ष श्रीकांत चंदनशिवे सचिव ज्ञानेश्वर कांबळे, डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण नागणे, शेतकरी संघटनेचे नेते प्रभाकर भैय्या देशमुख, माजी नगराध्यक्ष उज्वला भालेराव, प्रा.अनिल ननवरे,सल्लागार नितीन काळे,प्रा.सुदाम गायकवाड, प्रा. राजुभाई मुलानी ,अपराजित सर्वगोड, रामदास नागटिळक,विशाल आर्वे आदि मान्यवर उपस्थित होते.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सदस्य संभाजी शिंदे, अन्न आयोग अध्यक्ष महेश ढवळे, एलआयसी विकास अधिकारी बी एस चौगुले, जिल्हा परिषद सदस्य सुप्रिया गायकवाड, पंचायत समिती सदस्य विजय शिंदे,अक्काताई लोखंडे,सरपंच रणजीत जाधव, न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य के डी शिंदे,वसंतराव काळे हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय काळे,संस्कार इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष सीताराम माने व समस्त ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

# आनंदा धुमाळ यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरीएस.के.गायकवाड : वागदरी तालुका तुळजापूर येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सदन शेतकरी आनंदा तुळशीराम धुमाळ उर्फ आनंदा भाऊ यांचे दि.१५ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११.०० वा. दरम्यान दुःखद निधन झाले आहे.

कै.आनंदा भाऊ हे शेती व्यवसायात पारंगत होते. आपला शेती व्यवसाय सांभाळत ते राजकीय आणि सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय होते.राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती.विविध विकास कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी नळदुर्ग चे व्हाईस चेअरमन म्हणूनही त्यांनी काही काळ शेतकऱ्याचे प्रतिनिधित्व केले. दरम्यानच्या काळात शेती व्यवसायात अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला शेती विषयक कर्ज मिळवून देणे, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे, असे कार्य त्यांचे अविरतपणे चालू होते.एकंदरीत सर्वसामान्य शेतकऱ्यांचे साथीदार म्हणून त्यांनी सातत्याने शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यात त्यांचा मोठा हात खंड होता.शेती व्यवसायावर त्यांची खुप निष्ठा होती. शेतात कष्टाची कामे करत करत त्यांनी आपल्या मुलामुलींना शिक्षण देवून त्यांचा संसार उभा केला. दि.१५ एप्रिल २२६ रोजी रात्री ११.०० वा. अल्पशा आजाराने त्यांचे दुःखद निधन झाले. मृत्यू समई त्यांचे वय ७५वर्षे होते.वागदरी येथेच त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुलं दोन मुली सुना जावाई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

त्यांच्या दुःखद निधना बद्दल जि.प. चे अर्थ व बांधकाम सभापती सिध्देश्वर आण्णा कोरे, प.स. सदस्य भिवाजी इंगोले,नळदुर्ग न.प.चे नगर सेवक तथा गट नेते मारूती खारवे,रामतिर्थचे माजी सरपंच दामाजी राठोड, बोरगावचे माजी सरपंच मोहन माने सर सह उपस्थित सर्व शोकाकूल जन समुदायानी त्याना भावपूर्ण श्रद्धांजली वाहीली.

## शासकीय-निमशासकीय, संस्था-संघटनांकडून महामानवास अभिवादन

## सामाजिक उपक्रमांद्वारे डॉ. बाबासाहेबांना वाहिली आदरांजली

# खामसवाडी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



हनुमंत पाटुळे/खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील भिमनगर मध्ये भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव, बोधिसत्व, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त जयंती कमिटीच्या वतीने जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तींचे पुजन शिराढोण पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी बावनकर,व जयंती कमीटीचे उपाध्यक्ष माणीक सावंत यांच्या हस्ते करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. तर ध्वजारोहण भारत मारुती सावंत,व शिवाजी सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जयंती कमेटीचे अध्यक्ष जितेंद्र भारत सावंत, उपाध्यक्ष माणिक गणेश सावंत,सचिव आकाश शिवाजी रणदिवे, खजिनदार गौतम महादेव सावंत,तसेच जयंती कमिटीचे सदस्य राहुल सावंत,उत्तम सावंत, सुनील सावंत,चेतन सावंत, बौद्धराज गायकवाड , अमोल सोनटक्के,उत्तरेश्वर कांबळे दत्ता साळवे,भिमशाहीर राजेंद्र कांबळे, अशोक सावंत, चंद्रसेन सावंत, समाधान सावंत,जॉकी सावंत, प्रा.भीमराव सावंत, प्रमोद सावंत, तेजस सावंत,सचिन सावंत, शिवाजी सोनवणे, सर्जेराव सावंत, तेजस शिंदे, रोहित शिंदे,नानासाहेब सावंत, अभय सरवदे,अजित शेळके, नितीन शिंदे, सोनबा पाटोळे, यांच्या सह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- ■ खामसवाडी येथे विविध ठीकाणी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली...!!
- ■ कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे ग्रामपंचायत कार्यालया मध्ये सरपंच अमोल पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.
- ■ विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन संजय भाऊ पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.
- ■ प्रियदर्शनी सार्वजनिक वाचनालयात जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.
- ■ जिल्हा परिषद प्रशाला व जगदंबा माध्यमिक विद्यालयात जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विद्यार्थ्यांच्या संकल्पनांतून सोलापूर शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल : महापौर विनायक कोंडयाल

## एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये 'संवेद २०२६' स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनचा यशस्वी समारोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : संवेद २०२६ या स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनमधून आम्हाला शहरातील नागरी समस्यांवर अनेक अभिनव आणि व्यवहार्य उपाय मिळाले आहेत. या कल्पनांची अंमलबजावणी करून शहरातील सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ. असे विचार सोलापूरचे महापौर विनायक कोंडयाल यांनी व्यक्त केले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित 'संवेद २०२६' या स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनमधील अंतिम प्रकल्पांचे प्रदर्शन व पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रसंगी ते बोलत होते. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमात देशभरातील उच्च शिक्षण संस्था, महाविद्यालये आणि विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यानिमित्ताने सोलापूर शहरातील नागरी समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण




पाऊल उचलले गेले. हॅकाथॉनमधील अंतिम फेरीतील संघांनी १५ एप्रिल रोजी आपले प्रकल्प सादर केले, तर १६ एप्रिल रोजी विद्यापीठ परिसरात प्रकल्पांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले. आज या प्रदर्शनाचे उद्घाटन आणि त्यानंतर पारितोषिक वितरण समारंभ सोलापूरचे माननीय महापौर विनायक कोंडयाल, सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, मा. अच्युत गोडबोले, प्रा. कृष्णा वेदुला, प्रा. विल्यम ओक्स, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी आणि संचालक राघवेंद्र एम. चाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी बोलताना महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे म्हणाले महानगरपालिकेच्या वतीने आम्ही विद्यार्थ्यांनी शहरातील नागरी समस्यांवर सुचवेलेल्या उपाययोजना आणि संकल्पनांचे स्वागत करतो. पुढील सहा महिने ते एका वर्षाच्या कालावधीत त्यांचा पाठपुरावा करून प्रत्यक्ष क्षेत्रीय प्रकल्पांमध्ये रूपांतर करण्यास आम्ही उत्सुक आहोत. यासाठी आम्ही आवश्यक ते आर्थिक, पायाभूत आणि मनुष्यबळाचे साहाय्य देण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांना सहा महिन्यांच्या इंटर्नशिपची संधी देखील उपलब्ध करून देऊ.

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपळकृष्ण जोशी म्हणाले, विद्यापीठ म्हणून आम्ही विद्यार्थ्यांना समस्या-निवारक म्हणून घडवण्यासाठी कटिबद्ध आहोत. 'हॅकाथॉन' हा आजच्या जेन-झी'ला (Gen Z) समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे. या हॅकाथॉनमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उपायांची गुणवत्ता आणि नाविन्यता अत्यंत उल्लेखनीय आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्यांसोबत, प्रत्यक्ष समस्या समस्यांवर उपाय शोधण्याचा दृष्टीकोण विकसित होत आहे. या कार्यक्रमास महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्यासह इतर प्रशासकीय अधिकारी, विद्यापीठाचे कुलसचिव प्राणेश मुरनाळ, डॉ. प्रभा कसलीवाल, डॉ. दर्शन रुईकर, डॉ. आनंद शिंपी उपस्थित होते. याशिवाय सोलापूर मधील औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, देशाच्या विविध राज्यातील शिक्षण संस्थांमधील सहभागी संघांचे विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक तसेच एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातील अधिष्ठाता, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या हॅकाथॉनमध्ये सोलापूर महानगरपालिकेने शहरातील वाहतूक व पार्किंग व्यवस्थापन, रस्त्यांची स्थिती, पाणी वितरण, स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि डेटा-आधारित सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या नागरी समस्यांचा समावेश केला होता. विद्यार्थ्यांनी या समस्यांवर तंत्रज्ञानाधारित, व्यवहार्य आणि प्रभावी उपाय सादर करून आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला. या उपक्रमात देशातील १० राज्यांमधून २७०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून, एकूण ५४६ संघांनी नोंदणी केली. तज्ज्ञांच्या मूल्यमापनानंतर ७५ संघांची निवड करण्यात आली व त्यांना मार्गदर्शनासह प्रोटोटाइप विकसित करण्याची संधी देण्यात आली. अंतिम फेरीत २५ उत्कृष्ट संघांनी प्रवेश मिळवला.

या हॅकाथॉनमध्ये बंगळुरू येथील आर.व्ही कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या 'टीम अॅक्काबाइटने' प्रथम तर नवी मुंबई येथील एसआयइएस ग्रॅजुएट स्कूल ऑफ टेक्नॉलजीच्या 'टीम सुपरनोवा' यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. प्रथम विजेत्यांना रुपये दोन लाख (₹२,००,०००) आणि द्वितीय क्रमांकासाठी एक लाख रुपयांचे (₹१,००,०००) रोख पारितोषिक प्रशस्तिपत्रकासह देण्यात आले. तसेच नवी मुंबई येथील फ्रां.सी. रोड्रिग्स इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची 'टीम आयओटीयन्स', एनआयआयटी राजस्थानची 'टीम किलोबाईट' आणि हुबळी येथील केएलई टेक्नॉलॉजीकल यूनिवर्सिटीची 'टीम हायड्रो-ऑप्स' या तीन संघांना प्रत्येकी पन्नास हजारांचे (₹५०,०००) उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. याशिवाय रुपये पंचवीस हजारांचे स्पेशल ज्यूरी अवॉर्ड हुबळी येथील केएलई टेक्नॉलॉजीकल यूनिवर्सिटीच्या 'टीम गॉड-डॅम'ला देण्यात आले.

या हॅकाथॉनचे वैशिष्ट्य म्हणजे विविध शाखांतील विद्यार्थ्यांचा आंतरशाखीय सहभाग, शैक्षणिक व औद्योगिक तज्ज्ञांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष नागरी समस्यांवर आधारित आव्हाने. चरींहर्थेीझी तज्ज्ञांकडून आयोजित चढङ्ग कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यात आणि प्रोटोटाइप विकासात लक्षणीय वाढ झाली. संवेद २०२६ हा उपक्रम शासन, शिक्षण आणि उद्योग यांच्यातील प्रभावी समन्वयाचे उदाहरण ठरला असून, विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांमधून स्मार्ट आणि शाश्वत शहरी विकासाला नवी दिशा मिळाली आहे.

## डोहोळे येथे भरधाव चारचाकीची दुचाकीला जोरदार धडक; ज्येष्ठाचा जागीच मृत्यू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी-पडघा हद्दीत डोहोळे येथे भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत भादाणे गावातील रामचंद्र बाळू जाधव (वय ६३) यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही दुर्घटना बुधवार, दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, रामचंद्र जाधव हे दुचाकीवरून परतीचा प्रवास करत असताना डोहोळे परिसरात नाशिककडून मुंबईच्या दिशेने येणाऱ्या भरधाव चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, जाधव यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच पडघा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघातानंतर वाहनचालक नवनाथ काशिनाथ चौधरी याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित चालकाने नशेत वाहन चालविल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास पडघा पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दिलीप देशमुख करीत आहेत. या अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली असून रामचंद्र जाधव यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, मुंबई-नाशिक महामार्गावर सातत्याने घडणाऱ्या अपघातांमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वेग नियंत्रण, कडक अंमलबजावणी आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्थेची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## निफाड सायकलिस्ट वतीने नाशिक ते कामाख्या देवी सायकल राईडरचे स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक सायकलिस्ट आयोजित नासिक ते कामाख्या देवी मंदिर धारणगाव सायकल राईड चे आयोजन करण्यात आले होते. यात सुमारे सत्तर सायकलिस्टांनी सहभाग घेऊन प्रति गाणगापूर व कामाख्या देवी यांचे दर्शन घेतले.

निफाड सायकलिस्ट तर्फे कामाख्या देवी येथे काश्मीर ते कन्याकुमारी घ२घ राईड पूर्ण करणाऱ्या चंद्रकांत नाईक, रविंद्र दुसाने , साधना दुसाने, अमित घुगे, , सीमा घुगे, माधुरी गडाख, दविंदर भेला, अश्विनी कोंडेकर या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी श्रीनगर ते कन्याकुमारी असा विविध राज्यातून ११ दिवसात ३८०० किमी अंतर सायकलिंग पुर्ण केले. महिला सबलीकरण , मजबुत भारत जनजागृती करण्यात आली. यात चार महिला दोन ज्येष्ठ व तीन सायकलिस्ट सहभागी झाले होते. नाईक यांनी प्रवासादरम्यान आलेले अनुभव सांगितले. दिवसाला ३००-३५० किमीचे उद्दिष्ट ठेवलेले होते. तसेच उपस्थित सायकलिस्ट यांना अशी राईड करावी असे आवाहन केले. सर्वो पतरी मदत व मार्गदर्शन करण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. देशातील विविध सायकलिस्ट सदस्य यांचे कडून ठिकठिकाणी मिळालेले सहकार्य व स्वागत याचाही उल्लेख केला. अनिश्चित प्रवास केल्यामुळेच निश्चित ठिकाणी




पोहचता आल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच निफाड सायकलिस्ट आयोजित वसंतोत्सव २०२६ चॅलेंजमध्ये विविध महापुरुष जयंती/पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या सायकल राईड मध्ये सहभागी झालेल्या सायकलिस्टांचाही गौरव करण्यात आला.

राईड मध्ये नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन:अध्यक्ष - अमित नारायण घुगे, उपाध्यक्ष - .दविंदर सिंग भेला, संचालक - माधुरी गडाख, अश्विनी कोंडेकर,.सीमा घुगे, कारभारी भोर, किशोर पवार, मंगलसिंग पाटील, सूर्यकांत आहेर, कैलास भागवत, अनिल राऊत असे अनेक ज्येष्ठ सायकलिस्ट तसेच

निफाड सायकलीस्टचे अध्यक्ष पांडुरंग कडवे, उपाध्यक्ष - संदीप गवळी, सचिव दिपक बोरसे , संचालक दिपक घंगाळे, पुजा मगर, मनिषा वाघ, सदस्य प्रविण तनपुरे, अशोक कोल्हे, योगेश निफाडे, विष्णु सुरवाडे, गोरख शिंदे, अथर्व नकाते आदी उपस्थित होते. स्वागत संदीप गवळी तर प्रस्ताविक दिपक घंगाळे यांनी तर आभार अमित घुगे यांनी मानले.

## हत्तरसंग येथे शुक्रवारपासून ग्रामदैवत श्री महालिंगेश्वर यात्रेत सुरुवात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग येथे शुक्रवारपासून ग्रामदैवत श्री महालिंगेश्वर यात्रेस (अ किती अमावस्या निमित्ताने) सुरुवात असून शुक्रवार दिनांक १७/४/२०२६ रोजी सायंकाळी चार वाजता बारगला सिद्ध सुशत्र खजगी तालुका उमरगा जिल्हा धाराशिव आणि श्री महालिंगेश्वर हत्तर संघ तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर पालखी भेट १६ पार पडणार आहे तसेच त्याच दिवशी सायंकाळी सात वाजता शोभेचे दारू काम व रात्री आठ वाजता महाप्रसाद शनिवारी दिनांक १८/ ४ /२०२६ रोजी पहाटे पाच वाजता महाभिषेक व ठीक सायंकाळी नऊ वाजता गायन कार्यक्रम डोळ्याला पदगोळा महाप्रसाद त्यानंतर जिल्हा गुलबर्गे मुख्य गायक प्रकाश मास्तर अंगूर सगळं करू श्री गोळी मुत्या गायन संघ शिरवळ ते तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर मुख्य गायक ज्योतिबा पुजारी संगडगुरु यांची ढोलकी वरील गाणी संपन्न होणार असून त्याच दिवशी सायंकाळी पाच वाजता पालखी मिरवणूक करू तसेच रात्री ठीक नऊ वाजता महालिंगेश्वर कला नाट्य संघ, हत्तरसंग यांच्याकडून सुंदर सामाजिक कन्नड नाटक धर्मदाय नुडी बँके खेडी अर्थात अनाथ कठीण हर्षलंद थाळी कन्नड नाटक संपन्न होणार असून हत्तर संघ आणि परिसरातील सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान महालिंगेश्वर यात्रा महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन (रजि.) यांच्या वतीने भिम जयंती उत्साहात साजरी




मुंबई/केतन भोज : घाटकोपर (प.) येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन (रजि.) यांच्या वतीने आयोजित भिम जयंती उत्सव २०२६ तीन दिवसांच्या विविध कार्यक्रमांनी उत्साहात पार पडला.१० ते १२ एप्रिल दरम्यान झालेल्या वकृत्व स्पर्धेत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आंबेडकरी विचारांवर प्रभावी भाषणे सादर केली.स्पर्धेला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.१४ एप्रिल रोजी सायं.४ वाजता जागृती नगर ते जय महाराष्ट्र गणेश मैदानापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली.ढोल-ताशांच्या गजरात,आंबेडकरी घोषणांनी परिसर दुमदुमला.हजारो अनुयायी या मिरवणुकीत सहभागी झाले.रात्री १० वाजता झालेल्या बक्षीस वितरण व सत्कार समारंभात वकृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. तसेच समाजकार्य व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.अध्यक्ष प्रितेश यादव,सन्नी लिहिणार,विजय सावडे,गितेश कदम,शैलेश शेलार,सचिन खरात,सचिन बैसाने,राहुल जाधव सदाशिव जाधव,संतोष शेलार,योगेश कदम,उमेश कांबळे,राजन सोनवडेकर,नितीन यादव,दिनेश सावंत,शीतल शेलार,संकेत इजगज,विजय सावडे,हर्षल तांबे,रितेश कदम,भगवान नवगिरे जयद्रथ अहिरे(मामा)यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या उत्सवाने समाजात सामाजिक ऐक्य,सांस्कृतिक एकात्मता आणि आंबेडकरी विचारांचा प्रसार यांचा संदेश दिला. घाटकोपर परिसरात तीन दिवस उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी, येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

# बोळदे-कवठा शिवारात हत्तींनी केली मक्याची नासधूस, वनविभाग निद्रीस्त




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : जवळच्या बोळदे-कवठा या शेत शेवारात गडचिरोली जिल्ह्यातून आलेल्या हत्तींनी शेतातील मका पिकाचे ८०-९० टक्के नासधूस केलेली आहे. तरी मात्र वनविभाग हा निद्रा काढत असल्याचे शेतकरी बोलतात. झालेल्या नासधूसची जवळपास दोन ते अडीच लाख नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी केली आहे. यामधील चार ते पाच शेतकरी वर्गाचे प्रचंड नुकसान झाले आहे. सदर वनविभानी पंचनामे करावे व नुकसान भरपाई देण्यात यावी.

सदर घटना अर्जुनीमोरगाव तालुक्यातील बोळदे-कवठा येथे दि. १४ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास हत्तींचा कळप हा वेगवान गतीने येवून मका पिकाची अतोनात नुकसान केली आहे. तसेच कवठा व बोळदे गावातील नागरिक यांच्या मनात दहशत निर्माण झाली आहे भीतीचे वातावरण आहे.



या शेतकऱ्यांची झाली नुकसान किशोर येरणे, मारोती साऊस्कार, कैलाश येरणे, नारायण येरणे, चरणदास येरणे यांच्या शेतातील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेली आहे.



# धर्मादाय रुग्णालयाच्या वतीने गरजू रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध कराव्यात

## धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी; प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाच्या बाहेर दर्शनी भागात आरोग्य मित्र यांचे नाव व संपर्क क्रमांक असलेला डिस्प्ले बोर्ड लावावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**शासन तरतुदीनुसार धर्मदाय रुग्णालय रुग्णांना आरोग्य सेवा देत आहेत की नाहीत याच्या माहितीसाठी पथकामार्फत रुग्णालयांची तपासणी करण्यात येणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्यात १७ धर्मादाय रुग्णालय कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयांनी शासन निर्देशानुसार सर्वसामान्य, गरजू व गोरगरीब रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे अनिवार्य असल्याचे धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी यांनी निर्देशित केले आहे.




नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय समितीच्या त्रैमासिक आढावा बैठकीत समितीचे सचिव धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ, धर्मादाय निरीक्षक उमेश देशमुख, भागवत फुलसुंदर यांच्यासह समिती सदस्य व धर्मादाय रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

धर्मादाय उप आयुक्त श्री सूर्यवंशी पुढे म्हणाले की राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्ह्यातील सर्व १७ धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्याकडे येणाऱ्या गोरगरीब गरजू रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधेसह त्यांना व्यवस्थित माहिती देणे आवश्यक आहे. तसेच ज्या कारणासाठी शासनाने रुग्णालयांना मान्यता दिलेली आहे त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी प्रत्येक रुग्णालयांनी करणे आवश्यक आहे. तसेच ज्या कारणासाठी त्यांना शासकीय जागा उपलब्ध करून दिलेल्या आहेत, त्या जागेचा वापर वैद्यकीय सेवा देण्यासाठीच करावा अन्य व्यावसायिक कारणासाठी याचा वापर केला जाणार नाही याबाबतची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सुचित केले.

धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्याकडील आरोग्य सेवकांना योग्य प्रशिक्षण द्यावे. त्याप्रमाणेच शासनाच्या वतीने नियुक्ती केलेल्या पाच आरोग्य सेवकांनाही ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात आलेले आहे तरी संबंधित रुग्णालयाने ह त्यांना फील वरील प्रशिक्षण द्यावे. आरोग्य सेवक व रुग्णालय यांच्यात चांगला समन्वय असला पाहिजे तसेच आरोग्य सेवकांनी रुग्णालयात येणाऱ्या गरजू रुग्णांना उपचाराच्या अनुषंगाने तसेच त्यांनी विचारलेली सर्व माहिती व्यवस्थित सांगावी व योजनेचा क्लेम ऑनलाईन पद्धतीने कागदपत्रासह अद्यावत तयार करून द्यावा. संबंधित रुग्णालय योजनेत असलेल्या रुग्णाकडून अतिरिक्त पैसे घेणार नाहीत याची काळजी घ्यावी असे निर्देश श्री. सूर्यवंशी यांनी दिले.

त्याप्रमाणेच प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाच्या बाहेर दर्शनी भागात संबंधित आरोग्य सेवक अथवा आरोग्य मित्र याचे नाव व संपर्क क्रमांक डिस्प्ले बोर्ड च्या माध्यमातून लावावा. तसेच त्या बोर्ड वर टोल फ्री क्रमांक तक्रार निवारण क्रमांक ही उपलब्ध करून द्यावेत. जेणेकरून तिथे येणाऱ्या गरजू रुग्णांना तात्काळ आरोग्य मित्राच्या मार्फत सर्व प्रक्रिया वेगाने पार पडता येईल. व रुग्णालयाशी संबंधित तक्रार असेल तर तेही नोंदवता येईल. पुढील पंधरा दिवसात हे डिस्प्ले बोर्ड प्रत्येक रुग्णाला बाहेर लावले जातील याची खात्री महसुल यंत्रणेने करावी, अशा सूचना श्री. सूर्यवंशी यांनी दिल्या.

सर्व धर्मादाय रुग्णालयामध्ये शासन निर्देशाप्रमाणे आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत का नाहीत याबाबतची तपासणी संबंधित प्रांत अधिकाऱ्यांच् अध्यक्षतेखाली एक पथक तयार करून करण्यात येईल. या पथकामध्ये तहसीलदार, आरोग्य अधिकारी यांचाही समावेश केला जाईल. हे पथक रुग्णालयांची तपासणी करून त्याचा अहवाल एका महिन्यात देईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी सांगितले.

यावेळी समिती सदस्य तसेच धर्मादाय रुग्णालयांच्या प्रतिनिधी यांनीही त्यांच्या अडचणी तसेच रुग्णालयामार्फत रुग्णांना चांगली सेवा देण्याबाबत ची माहिती दिली.

# प्राचार्य शिवाजीराव बागल यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : लातूर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी चा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार मा. शिवाजीराव बागल सर यांना जाहीर करण्यात आला आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी आयोजित दुसरे मराठी साहित्य संमेलन लातूर येथे २८ एप्रिल २०२४ रोजी संपन्न होणार आहे. ह्या संमेलनात वाडीकुरोली तालुका पंढरपूर येथील ग्रामीण साहित्यिक प्राचार्य शिवाजीराव बागल सर लिखित दीपस्तंभया चरित्रात्मक कादंबरी लेखनात पुरस्कार प्राप्त झाला आहे दिवसभर चालणाऱ्या या साहित्य संमेलनात प्राध्यापक डॉक्टर माधव गाडेकर प्राध्यापक श्रीधर गायकवाड आनंद गायकवाड यांच्या हस्ते व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत सादर कार्यक्रमात बागल यांचा उत्कृष्ट कादंबरी लेखन साठी गौरव करण्यात येणार आहे. अल्पावधीतच संपूर्ण महाराष्ट्रभर ज्याचे ग्रामीण साहित्य घरोघरी पोहोचले आणि त्यांच्या मराठी साहित्यांचा लौकिक महाराष्ट्र तसेच महाराष्ट्र बाहेर झाला आहे अशा ग्रामीण साहित्यिक प्राचार्य शिवाजीराव बागल यांच्या साहित्याला यापूर्वी विविध बेचाळीस राज्यस्तरीय पुरस्कार व सन्मान मिळाले आहेत. प्राचार्य शिवाजीराव बागल यांच्या कादंबरीच हा मानाचा समजला जाणारा पुरस्कार जाहीर झाला असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी साहित्यिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत

# सोलापूर शहरातील महापौर, आयुक्तांकडून डॉ. आंबेडकर जयंती मिरवणूक मार्गाची पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १९ एप्रिल रोजी निघणाऱ्या भव्य मिरवणुकीच्या अनुषंगाने आज मिरवणूक मार्गाची पाहणी करण्यात आली. या पाहणी दौऱ्यात महापौर श्री. विनायक कोंड्याल यांच्या समवेत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, पोलीस आयुक्त श्री. एम. राजकुमार, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त श्री. संदीप कारंजे, पोलीस उपायुक्त गौउर हसन, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, नगर अभियंता सारिका अकुलवार, कार्यकारी अभियंता (विद्युत) राजेश परदेशी ,भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समिती व



बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते यामध्ये श्री.राजाभाऊ सरवदे, आनंद चंदनशिवे, बाळासाहेब वाघमारे,,के.डी.कांबळे,मिलिंद प्रेक्षाळे, सुबोध वाघमोडे,अजित बनसोडे,प्रवीण निकाळजे, रॉकी बंगाळे, सुशील सरवदे,दशरथ कसबे, पिंटू डावरे, विकी शेंडगे, शिवम सोनकांबळे,विनोद वाघमारे, बबन शिंदे तसेच ,,लौकिक इंगळे,विनीत गायकवाड,सुग्रीव जेटीथोर,अविनाश आठवले,योगेश कांबळे,शुभम धावने आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी मिरवणूक मार्गावरील विविध बाबींची सखोल पाहणी करण्यात आली. मिरवणुकीदरम्यान कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी रस्त्यावरील झाडांच्या फांद्या छाटणे, खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करणे, विद्युत खांबांवरील दिव्यांची दुरुस्ती करणे तसेच इतर आवश्यक कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना महापौर श्री. कोंड्याल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व आवश्यक उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याचे निर्देशही देण्यात आले.यावेळी पोलीस आयुक्त श्री. एम. राजकुमार म्हणाले, मिरवणूक मार्गावर कोणत्याही प्रकारचा वाहतुकीचा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस विभागाकडून सविस्तर नियोजन करण्यात आले असून आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक वळविणे, बंदोबस्त वाढविणे आणि नियंत्रणासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात येणार आहेत. तसेच मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज असून कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात येणार आहे.महापौर श्री. विनायक कोंड्याल म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीच्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाच्या वतीने सर्वोत्तम आणि सर्वंकष तयारी करण्यात आली असून नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी सर्व विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मिरवणूक मार्ग स्वच्छ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित राहावा यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने काम करत आहेत. तसेच नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करून शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुकीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयात कु. काजल जाधव यांचा सत्कार

**पुणे पोलीस विभागात नूतन भरती झाल्याने काजल जाधव याच्या सह माता-पित्यांचा केला सत्कार; खामसवाडी गावचा स्वाभिमान, मानाचा तुरा रोवला**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




हनुमंत पाटुळे/ खामसवाडी (प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनीं कु. काजल बालाजी जाधव यांची पुणे पोलीस या ठिकाणी नियुक्ती झाली असल्याने काजल जाधव यांच्यासह त्यांच्या पालकांचा सत्कार विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी महाविद्यालयाचे अध्यक्ष अशोक त्रिंबकराव शेळके हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार सुनील पाटील,माजी शिक्षक राम शेळके, पत्रकार हनुमंत पाटुळे, पत्रकार गोपाल शेळके यांचे उपस्थिती होती. यावेळी कु.काजल जाधव व त्यांच्या माता- पितांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिद्द,चिकाटी,अभ्यास, परीक्षा व कसरत हे या यशा मागील रहस्य आहे.असे काजल जाधव यांनी आपल्या मनोगतात मत व्यक्त केले. तसेच शेतकरी कुटुंबात बालाजी जाधव यांनी मुलिचे संगोपन करुन व शिक्षण शिकवुन तिला यशाच्या शिखरावर पोहोंचविले या बद्दल वडिलांचे व सत्कार मुर्ती काजल जाधव यांचे शब्द सुमनाने अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच पत्रकार हनुमंत भाऊ पाटुळे यांनी काजल बालाजी जाधव यांचे धाराशिव जिल्ह्यात खामसवाडी नगरी चे नाव रोषण करुन गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असुन आपल्या भावी जिवनात अशिच यशाची शिखरे पादाक्रांत करावी अशी भावना व्यक्त केली. तसेच जगदंबा माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष मा.अशोक शेळके यांनी आपल्या विद्यालयातील विद्यार्थिनी काजल जाधव हिची अतिशय कमी वयात शासकीय सेवेत निवड झाल्याने गावाचे,व जगदंबा माध्यमिक विद्यालयाचे नाव रोशन केले असे सांगितले. तर मुख्याध्यापिका मंदाकिनी सावंत यांनी आपणही काजल जाधव या सारखे प्रयत्न करुन शासकीय अधिकारी, कर्मचारी व्हावे असे शालेय विद्यार्थ्यांना आवाहन केले. यावेळी या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंदाकिनी सावंत सहशिक्षक अनंत गर्जे,सतीश डिकले, बिभिषण शिंदे, जालिंदर केंद्रे, बालाजी जमादार, आबाराव पाटोळे,उद्धव मेटे, आशाबाई पाटोळे, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक जालिंदर केंद्रे यांनी केले. तर आभार गरजे यांनी मानले.

# मंद्रूप पोलिसांच्या सुपरफास्ट रे क्यू! काळजाचा ठोका चुकवलेल्या अल्पवयीन मुलीचा पोलिसांनी फक्त बारा तासात केला शोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : एकीकडे गुन्हेगारीच्या बातमींची समाजमन अस्वस्थ होत असताना सोलापूर ग्रामीणच्या मंद्रूप पोलिसांनी मात्र आपल्या तत्परतेने माणुसकीचा आणि कर्तव्याचा नवा आदर्श घालून दिला आहे. घरातून बेपत्ता झालेल्या एका अल्पवयीन मुलीच्या पोलिसांनी केवळ बारा तासात शोध लावून तिला सुरक्षित घरी परत आणल्यावर पोलिसांच्या या देवदूतासारख्या कामगिरीमुळे एक कुटुंबाचे उध्वस्त होणारे सुख पुन्हा सावरले आहे.

तक्रार येतात तपासाची चक्री फिरवली व मंद्रूप पोलीस ठाण्याचे हद्दीतून एक अल्पवयीन मुलगी बेपत्ता झालेली खळबजावक माहिती समोर आली होती. मुलगी अल्पवयीन असल्याने या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी क्षणाचाही विलंब न लावता तपासात सुरुवात केली व मंद्रूप पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पटवारी आणि तातडीने विशेष पथक तयार करून परिसरातील माहिती आणि तांत्रिक बाबीची आधार घेतला.

तपास पथकाने मुलीच्या सुरक्षित शोधून काढले असून, या प्रकरणात कोणत्याही प्रकारची कसूर न ठेवता दोषीवर पोक्सो(झजउडज) कायद्याअंतर्गत कठोर गुन्हा दाखल केला आहे. कायद्याचा धाक निर्माण करताना पीडित मुलीला सुरक्षित वातावरणात तिच्या पालकाच्या स्वाधीन करण्यात आले. प्राथमिक तपासणीला मुलगी सुखरूप असल्याचे निष्पन्न झाले आहे या धाडसी आणि कौतुकास्पद कामगिरी सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर उपविभागीय संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रूप पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राज डांगे श्रेणी उपनिरीक्षक रवींद्र चव्हाण आणि पोलीस कॉन्स्टेबल अश्फाक मिळावाले यांनी पार पाडली व अव्यय अर्ध्या दिवसात आपल्या लेकीला समोर पाहून पालकाच्या डोळ्यात आनंदाश्रू चळवळी मंद्रूप पोलिसांच्या या कामगिरीची संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून कौतुक होत असून पोलीस सर्वसामान्यचे मित्र आहेत याची प्रचिती या घटनेने पुन्हा एकदा दिली आहे.

**विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना मिळाला वाव**

**विविध उपक्रमांचे आयोजन**

# लोटस इंग्लिश स्कूलमध्ये 'व्यक्तिमत्व विकास शिबिर' उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर पंचक्रोशीत आपल्या विविध शैक्षणिक उपक्रमांमुळे अल्पावधीत प्रसिद्ध झालेल्या कासेगाव (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संचलित लोटस इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना व्यासपीठ मिळावे या मुख्य उद्देशाने संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २७ मार्च ते दि. ०६ एप्रिल २०२६ या कालावधीत 'व्यक्तिमत्व विकास शिबिरा'चे आयोजन केले होते. या शिबिरास प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न झाले.




या शिबिराचे उदघाटन संस्थेच्या संस्था सदस्या सौ. मिनाक्षी रोंगे, श्रीमती वंदना रोंगे, सौ. अलका बागल, प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.स्नेहा रोंगे, स्कूलच्या प्राचार्या डॉ.जयश्री भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे आणि क्रीडा कौशल्यांचे दर्शन घडवले. नऊ दिवसांच्या या शिबिरात केवळ शारीरिक खेळच नव्हे, तर बौद्धिक आणि मानसिक विकासासाठी अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रोप मल्लखांब, लाठी-काठी, योगा, कराटे, नेमबाजी, तलवारबाजी यांसारख्या साहसी खेळांसोबतच चित्रकला, वक्तृत्व, डान्स आणि एरोबिक्स अशा विविध स्पर्धा पार पडल्या. विविध स्पर्धा प्रकारात कराटे स्पर्धेत अथर्व नवनाथ भोसले, सिद्धार्थ निखिल कोंडुसकर, राजवी अविनाश मोटे-पाटील, समृद्धी सतीश झिरपे, लाठी-काठी स्पर्धेत श्रुती सोमनाथ लोणकर, श्रद्धा मोरे, श्रीराम समाधान लवटे, संग्राम ज्ञानेश्वर देशमुख तसेच जिम्नॅस्टिक खेळात समृद्धी मोरे, जिजा सुरज रोंगे, वेदांत कुंभार, वेदांत कदम, रोप मल्लखांब मध्ये शौर्य नितीन गायकवाड, प्रदीप विकास राऊत, इशिता बालाजी बनसोडे, भक्ती कुरे, नृत्य प्रकारात त्रिशा सुडके, सई घोडके, क्षितिज शिवशरण, गौरव बनसोडे तर बेस्ट कमांडो म्हणून शौर्य प्रसाद चव्हाण, रुजुला ज्ञानेश्वर विजागत हे विद्यार्थी विजेते ठरले. नामांकित प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेचे प्रशस्त व हवेशीर वातावरण हे या शिबिराचे मुख्य आकर्षण होते. विद्यार्थ्यांसाठी टी-शर्ट, सहभाग प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्हे, थंड पेय यांची उत्तम सोय करण्यात आली होती. तसेच वन मिनिट शो,जादूचा शो आणि संगीत खुर्ची, मजेदार गाणी यांसारख्या 'फनी गेम्स'मुळे विद्यार्थ्यांनी या शिबिराचा आनंद मनमुरादपणे लुटला. शिबिराच्या समारोप प्रसंगी विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव संस्थेचे अध्यक्ष बी.डी. रोंगे व माजी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.विश्वासराव मोरे व पाहुण्यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मयुर वागज, अस्मिता घोलप, प्रकाश शिवशरण, राज हजारे, सुहास जाधव, सौरभ नेहतराव यांच्यासह शाळेतील इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. पालकांनीही शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा शिबिरांमुळे मुलांमध्ये शिस्त आणि आत्मविश्वास वाढत असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका किशोरी भोसले व कल्पना जगताप यांनी केले तर शिक्षिका प्रांजली देशमुख यांनी आभार मानले.